# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २४०/८८ मधील निशाणी क्र. १२१ वर आदेश

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७ नियम १ सह कलम ११४ व १५१ खालील तरतुदीनुसार नि.क्र. ९२ वरील आदेशाचे पुनर्विलोकन करण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जाला प्रतिवादीतर्फे म्हणणे देऊन तीव्र विरोध दर्शविला आहे.

२. सदर प्रकरणामधील वादीचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा अर्ज वादीने नि.क्र. ९२ वरील आदेशाची पुनर्विलोकनाकरीता दाखल केला आहे. सदर प्रकरणातील वादीने नि.क्र. ९२ ला मुळ दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ८(१)(बी) खालील तरतुदींनुसार परवानगी मिळणेकरीता दाखल केला होता. सदर नि.क्र. ९२ वरील अर्ज दि. २४/०९/२०१४ रोजी नामंजूर करण्यात आलेला आहे. सदर अर्जातील कथनावरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, वादीने नि.क्र. ९२ मध्ये न्यायालयाने नोंदविलेले निष्कर्ष सकृतदर्शनी चुकीचे व गैरसमजुतीच्या आधारावर असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच नि.क्र. ४७ वरील अर्जाचा व आदेशाचा न्यायालयाने चुकीचा अर्थ लावलेला आहे. तसेच नि.क्र. ९२ वरील अर्जामध्ये वादीने मागितलेली परवानगी न्यायालयाने नामंजूर

केलेली आहे. त्यामुळे सदर नि.क्र. ९२ वरील आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता असल्याचे वादीने कथन केले आहे.

४.                    सदर प्रकरणातील नि.क्र. ९२ वरील व नि.क्र. ४७ वरील आदेशावरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, नि.क्र. ४७ वरील अर्जामध्ये मुळ दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी अर्ज दाखल केलेला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने दि. १०/०७/१९८९ रोजी मंजूर केलेला असून त्यानुसार वादीने नि.क्र. १ मध्ये दुरूस्तीदेखील दि. १०/०७/१९८९ रोजी केलेली आहे. तसेच नि.क्र. ४७ वरील अर्जामध्ये वादीने दुरूस्ती करण्याबाबतच्या मजकुराला एकेरी अवतरण चिन्ह केलेले आहे. सदर नि.क्र. ४७ वरील अर्जामध्ये वादीने केवळ 'भिमसेन व्यंकटेशाचार्य (भिमाचार्य बाळाचार्य) वरखेडकर' च्या मजकुराला एकेरी अवतरण चिन्ह केलेले आहे व त्यानुसार तेवढयाच मजकुराबाबत न्यायालयाने मुळ दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे सदर अर्जामध्ये व नि.क्र. ९२ वरील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वादीला मुळ दाव्यामध्ये नि.क्र. ४७ वरील आदेशानुसार दुरूस्ती करण्यास परवानगी दिल्याचा निष्कर्ष निघत नाही. त्याबाबत देखील निष्कर्ष नि.क्र. ९२ वरील आदेशामध्ये नमूद करण्यात आलेला आहे. त्यामुळे नि.क्र. ९२ वरील आदेशामध्ये सकृतदर्शनी चुक झाल्याचे वादीच्या अर्जातील कथनावरून सिध्द होत नाही.

५.                    तसेच सदर नि.क्र. ९२ वरील अर्जामध्ये वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ८(१)(बी) खालील तरतुदींनुसार

परवानगी मिळणेसाठी विनंती केली होती. त्याबाबत नि.क्र. ९२ वरील आदेशामध्ये निष्कर्ष नोंदवून सदरची विनंती देखील नामंजूर करण्यात आलेली आहे. सदर आदेशाबाबत देखील चुक झाल्याचे सदर अर्जातील कथनावरून प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. त्यामुळे सदर अर्जातील कथन, नि.क्र. ९२ व नि.क्र. ४७ वरील आदेश विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, नि.क्र. ९२ वरील आदेशाचे पुनर्विलोकन करण्याकरीता अर्जात नमूद केलेले कारण हे अपुरे आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## **आदेश**

१. नि.क्र. १२१ वरील अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

सही/—

दि. १७/१२/२०१४.　　(शि. म. गौरगोंड)

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.